या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती एफ पेल्हार हद्दीतील पेल्हार विभाग येथील **मालमत्ता-क्र. पी.एल.१४/५९७/१** ही मिळकत **अब्दुल कलाम शफीउल्ला खान** यांच्या नावे आहे. ही मिळकत **मो. सलीम मो. रईस, मो. अनीश मो. रईस** यांच्या नावे कायम स्वरुपात हस्तांतरित करण्यात येत आहे. या मिळकती बाबत कुणाची हरकत/हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून सात (७) दिवसांचा आत वसई विरार शहर महानगरपालिका, क्षेत्रीय पेल्हार विभाग कार्यालयात लेखी पुराव्यास कळवावे. अन्यथा संबंधिताचा कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/-**

**ठिकाण- पेल्हार**
**दि. - ३०/११/२०२४**

**मो. सलीम मो. रईस**
**मो. अनीश मो. रईस**

# कल्याण महापालिकेच्या ८/ग प्रभागात थकबाकी पोटी ५ दुकानगाळे आणि क्रिटीकल केअर सेंटर सिल करण्याची धडक कारवाई !

कल्याण, डोंबिवली (पूर्व) ८/ग प्रभाग क्षेत्रातील बिगर निवासी मालमत्तांना वारंवार नोटीस देवूनसुध्दा मालमत्ता कराचा भरणा करीत नसल्यामुळे महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांचे निर्देशानुसार आणि कर निर्धारण व संकलन विभागाच्या स्वाती देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली ८/ग प्रभागाचे सहा.आयुक्त संजयकुमार कुमावत, अधिक्षक ज्ञानेश्वर कंखरे यांच्या पथकाने





थकबाकी पोटी असलेल्या मालमत्ता सिल करण्याची धडक कारवाई आज दिवसभरात केली. यामध्ये डडोंबिवली (पूर्व) नांदिवली रोड येथील गोविंद राजाराम पाटील यांच्या र ठ ा ^ ठ ा ऽ म ा रु.११,३७,२३४/- थकबाकीपोटी एकूण ५ दुकान गाळे सिल करण्यात आले.तसेच डडोंबिवली (पूर्व) मानपाडा रोड येथील लक्ष्मी निवास येथील क्रिटीकल केअर सेंटर रक्कम रु. ७,१६,७४३/- इतक्या थकबाकी पोटी सिल करण्यात आले.

# जिल्ह्यात दि.१४ डिसेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**ठाणे,** प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री.श्रीनिवास अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार, दि.१४ डिसेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय लोकअदालत चे आयोजन करण्यात आले आहे. न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेली प्रकरणे आणि दाखल पूर्व प्रकरणे सुनावणीसाठी लोक अदालतीमध्ये ठेवता येतील. संबंधितांनी आपल्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी शनिवार, दि.१४ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित केलेल्या लोकअदालतीमध्ये आपली प्रकरणे ठेवावीत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्या.ईश्वर सुर्यवंशी यांनी केले आहे. न्या.ईश्वर सुर्यवंशी म्हणाले की, लोक अदालतच्या निवाड्याविरुध्द अपील नाही, एकाच निर्णयात कोर्टबाजीतून कायमची सुटका होते, खटल्यांमध्ये साक्षी पुरावा, उलटतपासणी, दिर्घ युक्तीवाद या बाबी टाळल्या जातात. निकाल झटपट लागतो. लोक अदालतीत होणारा निवाडा हा आपआपसात समजूतीने होत असल्याने कुणाची हार वा जीत होत नाही. लोक अदालतीचा निवाडा दोन्ही पक्षांना समाधान देतो, परस्पर संमतीने निकाल होत असल्याने एकमेकांतील द्वेष वाढत नाही व कटुताही निर्माण होत नाही. कोर्टाच्या हुकूमनाम्याप्रमाणे लोक अदालतीत होणाऱ्या निवाड्याची अंमलबजावणी कोर्टामार्फत करता येते, वेळ पैसा यांची बचत होते, इतकेच नव्हे तर लोक अदालतीत निकाली निघणाऱ्या प्रकरणांमध्ये कायद्यानुसार कोर्टफीची रक्कम परत मिळते. लोकअदालतचे महत्व लक्षात आल्याने यापूर्वी झालेल्या राष्ट्रीय लोकअदालतींमध्ये ठाणे जिल्ह्यात उत्सफूर्त प्रतिसाद मिळाला असून राष्ट्रीय लोकअदालतचा फायदा पक्षकारांना मिळाला आहे. तरी आपली प्रलंबित तसेच दाखल व्हावयाची आहेत अशी प्रकरणे लोक अदालतीमध्ये सुनावणीसाठी ठेवण्याकरिता संबंधित न्यायालयातील तालुका विधी सेवा समिती अथवा जिल्हा विधी सेवा समिती प्राधिकरण यांच्या कार्यालयांशी संपर्क साधावा आणि लोक अदालतीमध्ये सहभागी होऊन आपले वाद सामोपचाराने कायमचे मिटवावेत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे सचिव न्या.ईश्वर सुर्यवंशी यांनी केले आहे.

# उल्हासनगर शहरात मटक्याच्या अड्ड्यावर पोलिसांची धाड २६ जणांवर कारवाई

**उल्हासनगर (प्रतिनिधी) :** उल्हासनगर शहरात जुगार व मटका जोरात सुरु आहे. या मटका व जुगार मुळे गोरगरीब माणुस देशोधडीला लागला आहे. पोलिस मात्र थातुर मातुर कारवाई करुन या मटक्यावाल्याना मोकळे सोडुन देत असल्याने मटका जुगार बिनधास्तपणे चालवत आहेत . परवा उल्हासनगर कँप ३ येथील पिंटो बठीजा यांच्या पिंटो पार्क हॉटेल च्या परिसरात सुरु असलेल्या जुगार मटक्यावर कल्याण च्या गुन्हेशाखेने धाड मारत १६ जणांवर कारवाई करत अटक केली असुन काल रात्री कँप २ येथील फकलमंडळी येथे शंकर कुकरेजा यांच्या जुगार मटक्यावर धाड मारत १० जणाना अटक केली आहे.या मटका जुगाराच्या अड्ड्यावर कारवाई करत एकुण २६ जणांना अटक केली आहे. उल्हासनगर कँप ३ येथील पिंटो पार्क हॉटेलच्या पाठीमागे बिनधास्त पणे मटका जुगार चालु होता. हे हॉटेल भाजपाचे आमदार कुमार आयलानी भाच्याचे असुन येथे खुलेआम मटका चालवुन गोरगरीबाना लुटन्याचा प्रकार सुरु होता. ही माहिती कल्याण येथील गुन्हेशाखेच्या अधिकाऱ्याना मिळाली तेव्हा परवा या हॉटेल परिसरात सुरु असलेल्या मटका जुगारावर धाड मारत १६ जणांवर कारवाई केली आहे. यामध्ये खेळणारे व खेळवणारे असुन त्यांच्या कडुन २४ हजार १५० रुपये हस्तगत केले आहेत. हा मटका चंदर डोरुमल वलेच्छा हा इसम चालवत होता. दरम्यान उल्हासनगर कँप २ येथील फकलमंडळी खेमानी परिसरात शंकर कुकरेजा नावाचा इसम मटका जुगार चालवत असल्याची माहिती उल्हासनगर पोलिसाना मिळाली तेव्हा पोलिसानी या अड्ड्यावर धाड मारत १० जणाना अटक केली आहे. यांच्या कडुन ९३५० रुपये हस्तगत केले आहेत. दरम्यान शंकर कुकरेजा हा इसम गेल्या अनेक महिन्यापासुन मटका जुगार चालवत आहे.

# विभागीय लोकशाही दिन ०९ डिसेंबर २०२४ रोजी

नवी मुंबई, कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन सोमवार दि. ०९ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह, १ ला मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील प्रमुख अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. असे कोंकण विभागाचे उप आयुक्त (सामान्य प्रशासन) विवेक गायकवाड यांनी कळविले आहे.

# सामाजिक न्याय विभागाच्या योजना प्रभावीपणे लाभार्थ्यापर्यंत पोहोचवा - धर्मपाल मेश्राम, उपाध्यक्ष तथा सदस्य अनु. जाती-जमाती आयोग, महाराष्ट्र राज्य

**नवी मुंबई (प्रतिनिधी),** समाजातील वंचित घटकांसाठी सामाजिक न्याय विभागाच्या योजना अत्यंत महत्वाच्या असून, त्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न करावे. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबईचे उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा) धर्मपाल मेश्राम यांनी केले. सामाजिक न्याय विभागाच्या मुंबई विभागाअंतर्गत समाजातील वंचित घटकांसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची आढावा बैठक उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा) धर्मपाल मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी ते बोलत होते. या आढावा बैठकीस समाज कल्याण, मुंबई विभागाचे प्रादेशिक उपायुक्त बाळासाहेब सोळंकी तसेच योजनेशी संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या बैठकीत श्री. मेश्राम यांनी मुंबई विभागात सामाजिक न्याय विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजना, शासकीय वसतिगृह, निवासी शाळा, सैनिकी शाळा, अनु.जाती जमाती (अत्याचार प्रतिबंधक) सुधारीत अधिनियम २०१५ अंतर्गत घडलेल्या अत्याचार पिडित व्यक्ती व कुटुंबियांना दिलेले आर्थिक सहाय्य व पुनर्वसन, औद्योगिक सहकारी संस्था इत्यादी योजनांच्या खर्चाचा आढावा घेतला. यावेळी सामाजिक न्याय विभागाच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न करावेत जेणे करून समाजातील वंचित घटकांना न्याय मिळेल. असे आवाहन धर्मपाल मेश्राम यांनी यावेळी केले. तसेच योजनांचा खर्च १०० टक्के करावा अशा सुचनाही अधिकाऱ्यांना दिल्या.

# मालमत्ता हस्तांतरण नोटीस

या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती एफ पेल्हार हद्दीतील पेल्हार विभाग येथील **मालमत्ता-क्र. पी.एल.०८/६७८/२** ही मिळकत **आयशा मोहम्मद मुस्तफा खान** यांच्या नावे आहे. ही मिळकत **मोहम्मद अकरम मोहम्मद सैफ सय्यद** यांच्या नावे कायम स्वरुपात हस्तांतरित करण्यात येत आहे. या मिळकती बाबत कुणाची हरकत/हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून सात (७) दिवसांचा आत वसई विरार शहर महानगरपालिका, क्षेत्रीय पेल्हार विभाग कार्यालयात लेखी पुराव्यास कळवावे. अन्यथा संबंधिताचा कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/-**

**ठिकाण- पेल्हार**
**दि. - ३०/११/२०२४**

**मोहम्मद अकरम मोहम्मद सैफ सय्यद**

**ASREC (India) Limited**

इमारत क्र. २, युनिट क्र. २०१-२०२ A आणि २००-२०२ B, भूतळ, सोलिटेअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी-घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३.

**परिशिष्ट-IV-अ**

**सिक्युरिटायझेशन आणि वित्तीय मालमत्ता पुनर्रचना आणि सुरक्षाहित अधिनियम अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठीची विक्री नोटीस (सुरक्षाहित (अंमलबजावणी) नियम २००२ मधील नियम ८ (६) आणि नियम ९ सहवाचनिय**

ज्याठिकाणी,

एएसआरईसी (इंडिया) लिमिटेड ही एक सिक्युरिटायझेशन आणि मालमत्ता पुर्नरचना कंपनी आहे (यानंतर "एएसआरईसी" म्हणून संबोधले जाईल) आणि कर्जदार खात्यांची सुरक्षित कर्जदार आहे, जे ०४.०१.२०२२ रोजी वसई विकास सहकारी बँक लिमिटेड बरोबरच्या हस्तांतरण कराराद्वारे सुरक्षित कर्ज हस्तगत केले आहे. यामध्ये एम/एस. **शाम इलेक्ट्रोमेक प्रा. लि. आणि/ किंवा संचालक व हमीदार- १) श्री. संतोष शाम चाफेकर, २) श्रीमती शीतल संतोष चाफेकर,३) श्रीमती मंदा शाम चाफेकर** यांचा समावेश आहे. हे हस्तांतरण मूळ कर्जदार वसई विकास सहकारी बँके कडून करण्यात आले आहे.

एएसआरईसी (इंडिया) लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सिक्युरिटायझेशन आणि वित्तीय मालमत्ता पुर्नरचना वसुरक्षाहित अधिनियम, २००२(SARFAESI) आणि सुरक्षाहित (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक १०.११.२०२२ रोजी कलम १३(२) अंतर्गत कर्जदार एम/एस. शम इलेक्ट्रोमेक प्रा. लि. यांना रु. **४.६८,८९,२१८/- (रुपयेः चार कोटी अडुसष्ठ लाख एकोणनव्वद हजार दोनशे अठरा फक्त) इतकी** एकूण थकबाकी ३१.१०.२०२२ पर्यंत चुकवण्यासाठी मागणी नोटीस दिली होती, ज्यासाठी ६०दिवसांचा कालावधी देण्यात आला होता.

कर्जदार, संयुक्त/सह-कर्जदार किंवा हमीदार यांनी वरील मागणी नोटिशी नुसार पैसे भरलेले नसल्यामुळे आणि सिक्युरिटीहित अधिनियमाच्या कलमनुसार वाचनीय सुरक्षाहित (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत प्राधिकृत अधिकाऱ्यांनी दिनांक ०५.०७.२०२४ रोजी खाली नमूद केलेल्या मालमत्तेचा भौतिकता बा घेतला आहे.

हस्तांतरण करार दिनांक ०४. ०१.नुसार, एएसआरईसी (इंडिया) लिमिटेडने वसई विकास सहकारी बँक लिमिटेड कडून वरील कर्जदारांचे वित्तीय मालमत्ता त्यांच्या सर्व अधिकारांसह हस्तगत केले आहे.

वरील कर्जदार, संयुक्त/सह-कर्जदार किंवा हमीदार यांनी थकीत रक्कम भरण्यात अपयश आले असल्यामुळे व वसई विकास सहकारी बँकेने ए एस आर ई सी (इंडिया) लिमिटेडच्या फायद्यासाठी केलेल्या हस्तांतरणा नुसार, एएसआरईसी (इंडिया) लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांना खाली नमूद केलेली मालमत्ता विकून थकीत रक्कम वसूल करण्याचा उद्देश आहे.

सर्व सामान्य जनते सव विशेषतः कर्जदार, संयुक्त/सह-कर्जदार आणि हमीदारांना कळविण्यात येते की, ए एस आर ई सी (इंडिया) लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी खाली नमूद केलेली सुरक्षित मालमत्ता विकण्याचा उद्देश ठेवत आहेत. मालमत्ता **"जशी आहे, जिथे आहे", "जशी स्थिती आहे", "ज्या स्थितीत आहे" आणि "कोणताही दावा न करता" अशा तत्त्वावर विकली जाईल, याची नोंद घ्यावी.**

| लॉट क्र | सुरक्षित मालमत्तेचे वर्णन | रिझर्व्ह किंमत | बयाणा पैसा ठेव | बोली वाढीची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | फ्लॅट क्र. २०१ (नवीन फ्लॅट क्र. ३०३), सुमारे मोजमाप असलेले क्षेत्र ४८.५२ चौ.मी. दुसऱ्यावर ५२२ चौ. फूट (बिल्ट अप) च्या समतुल्य अनंतराज को-ऑपरेटिव्ह एचएसजी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीतील मजला. समाज लि. डहाणूकर वाडी, कॅप्टन समीर येथे स्थित आहे चंदा विरुद्ध आर के आर लेन , कांडी विरुद्ध अ एल आम्ही टी , मुंबा आय -४०००६७,श्री.संतोष एस चाफेकर यांच्या मालकीचे | १००.०० | १०.०० | ०.५० |
| २. | फ्लॅट क्रमांक २०२ (नवीन फ्लॅट क्रमांक ३०१), सुमारे ४५७ क्षेत्रफळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीतील दुसऱ्या मजल्यावर चौ. फूट (बांधलेले). अनंतराज सहकारी hsg. समाज लि. खोटे बोलणे आणि स्थित आहे डहाणूकर वाडी, कॅप्टन समीर चंदावरकर लेन येथे, कांदिवली पश्चिम, मुंबई -४०००६७, श्रीमती मंदा एस यांच्या मालकीची चाफेकर | ८०.०० | ८.०० | ०.५० |
| | **एकुण** | **१८०.००** | **१८.००** | |

मालमत्तेची तपासणीः २०.१२.२०२४ रोजी सकाळी ११ वा. दुपारी ०२.०० ते बोली फॉर्मचे संकलनः ०२.१२.२०२४ ते ३०.१२.२०२४ - सकाळी १०.०० ते दुपारी २.०० पर्यंत. बिड फॉर्म सबमिट करणेः ३०.१२.२०२४ पर्यंत दुपारी ०४.०० पर्यंत. बोली फॉर्म संकलन/सबमिशनचे ठिकाणः ASREC (INDIA) लिमिटेड च्या कार्यालयातून २०१/२०२ A, इमारत क्रमांक २, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी-घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पू), मुंबई - ४०००९३. लिलाव आणि बोली उघडण्याचे ठिकाण: ASREC द्वारे प्राप्त झालेल्या ऑफर/निविदा, उघडल्या जातील अधिकृत अधिकारी आमच्या उपरोक्त कार्यालयात ३१.१२.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता. ज्यामध्ये परस्पर बोली लावणे, होऊ शकते.

**अटी आणि नियमः**

१. प्राधिकृत अधिका-याच्या उत्तम ज्ञान आणि माहितीनुसार, त्यावर कोणतेही बंधन नाही मालमत्ता इच्छूक बोलीदारांनी यासंदर्भात स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी बोजा, लिलावात ठेवलेल्या मालमत्तेचे शीर्षक आणि मालमत्तेवर परिणाम करणारे दावे/हक्क/देयके त्यांच्या बोली सादर करणे. सार्वजनिक लिलावाची जाहिरात तयार होत नाही आणि ती मानली जाणार नाही कोणतीही वचनबद्धता किंवा ASREC चे कोणतेही प्रतिनिधित्व तयार करा. मालमत्ता सर्वासह विकली जात आहे एएसआरईसीला ज्ञात किंवा अज्ञात असले तरीही विद्यमान भार. अधिकृत अधिकारी / सुरक्षित कोणत्याही तृतीय पक्षाच्या दाव्यांसाठी/अधिकार/दृश्यांसाठी कर्जदार कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.
२. "जसे आहे तसे", "जसे आहे तसे" आणि वर म्हटल्या प्रमाणे संपूर्ण मालमत्तेचा लिलाव केला जाईल.
"जे काही आहे तसे" आणि कोणताही आधार नाही.
३. लॉट क्रमांक १ वर नमूद केलेली मालमत्ता लॉट क्रमांक २ सोबत विकली जाईल. अभिप्रेत बोलीदार लावू शकतो. लॉट नंबर १ आणि लॉट नंबर २ साठी स्वतंत्रपणे किंवा दोन्हीसाठी एकत्रितपणे बोली.
४. बिड फॉर्म रु.च्या पेमेंटवर उपलब्ध होईल. ५००/-प्रति फॉर्म (परतावा न करण्यायोग्य).
५. निविदा दस्तऐवजात दिलेल्या विहित नमुन्यातील बोली अधिकृत कडे सादर केली जाईल ASREC (इंडिया) लिमिटेडचे अधिकारी, Bldg. क्रमांक २, युनिट क्रमांक २०१-२०२ A आणि २००-२०२ B, Gr. मजला, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००९३ वर किंवा
३०.१२.२०२४ पूर्वी संध्याकाळी ०४.०० पर्यंत. बिड फॉर्म किंवा द अर्नेस्ट मनी डिपॉझिट (EMD) नंतर प्राप्त झाले ३०.१२.२०२४ रोजी ०४:०० PM कोणत्याही कारणास्तव मनोरंजन केले जाणार नाही. ईएमडी शिवाय बोली लागेल सरसकट नाकारले.
६. यशस्वी बोली लावणाऱ्याचा ईएमडी विक्रीच्या मोबदल्याच्या भागासाठी आणि ईएमडीकडे ठेवला जाईल.
अयशस्वी बोलीदारांना त्याच प्रकारे परतावा दिला जाईल. EMD कोणतेही व्याज सहन करणार नाही. द जलद आणि योग्य परतावा सुलभ करण्यासाठी बोलीदारांना त्यांच्या बँक खात्याचे तपशील देण्याची विनंती केली जाते.
७. यशस्वी बोलीदाराने लगेच म्हणजे त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवसापेक्षा नंतर नाही
असे असू शकते की, विक्री किमतीच्या २५% (जमा केलेल्या EMD रकमेसह) अधिकृतकडे जमा करा.
अधिकारी आणि अशा ठेवी चुकवल्यास, EMD जप्त केला जाईल आणि मालमत्ता पुन्हा विकली जाईल.
८. विक्री किमतीची शिल्लक रक्कम विक्रीच्या पुष्टीकरणाच्या १५ व्या दिवशी किंवा त्यापूर्वी भरली जाईल
मालमत्ता किंवा असा विस्तारित कालावधी ज्यावर सुरक्षित धनको यांच्यात लेखी सहमती असेल आणि यशस्वी बोलीदार. वरील विहित कालावधीत पैसे न भरल्यास, ठेव होईल जप्त केली जाईल आणि मालमत्ता पुन्हा विकली जाईल आणि चूक करणारा खरेदीदार सर्व दावे जप्त करेल मालमत्ता किंवा रकमेचा कोणताही भाग ज्यासाठी ती नंतर विकली जाऊ शकते.
९. विक्री सिक्युरिटायझेशन अंतर्गत विहित नियम/शर्तींच्या अधीन असेल आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा, २००२ अंमलबजावणी.
१०. ईएमडी रकमेशिवाय आणि/किंवा राखीव किंमतीपेक्षा कमी बोली स्वीकारली/पुष्टी केली जाणार नाही.
११. इच्छुक खरेदीदार/बिडर्सना ईएमडी रक्कम एनईएफटी/द्वारे जमा करणे आवश्यक आहे. बँक ऑफ इंडिया, SSI, अंधेरी शाखा, IFSC कोडसह खाते क्रमांकः ००९०२०११०००१५३३ मध्ये RTGS: BKID००००९०. किंवा "ASREC-PS ०५/२०२१-२२ ट्रस्ट" च्या बाजूने काढलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे. कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा अनुसूचित बँकेवर काढलेले आणि मुंबई येथे देय.
१२. इच्छुक बोलीदार २०.१२.२०२४ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० पर्यंत मालमत्तेची तपासणी करू शकतात. संपर्क तपशीलः श्री. आय. एन. बिस्वास - ०२२ -६१३८७०५३, श्री. जगदीश शाह - सेल क्रमांक ७०२१४ २८३३६, ०२२ कोणत्याही प्रश्नासाठी ६१३८७०४२ वर संपर्क साधला जाऊ शकतो.
१३. अधिकृत अधिकाऱ्याला कोणत्याही किंवा सर्व ऑफर स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा आणि/किंवा त्यात बदल करण्याचा अधिकार आहे. कोणतेही कारण न देता अटी/शर्ती.
१४. यशस्वी बोलीदार नोंदणी, मुद्रांक शुल्क, यासाठी देय असलेले शुल्क/शुल्क सहन करेल. नोंदणी शुल्क, आनुषंगिक खर्च इ. कायद्यानुसार लागू.
१५. विक्रीच्या अटी व शर्तींचे पालन केल्यावर आणि विक्रीची पुष्टी केल्यावर अधिकृत अधिकारी यशस्वी बोलीदाराच्या नावे विक्रीचे प्रमाणपत्र जारी करतील.
१६. येथे नियोजित लिलाव कोणत्याही कारणास्तव अयशस्वी झाल्यास, ASREC या सूचनेद्वारे खाजगी कराराद्वारे किंवा त्याखालील सुरक्षित मालमत्ता लिलावात विकण्याचा अधिकार सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम आणि सरफेसी कायदा, २००२ च्या नियम ८(५) च्या तरतुदी
१७. सर्वोच्च बोली सुरक्षित धनको/अधिकृत अधिकाऱ्याच्या मान्यतेच्या अधीन असेल.

**कर्जदार आणि संयुक्त/सह-कर्जदार/जामीनदार यांना ३० (तीस) दिवसांची सूचना संदर्भ क्र ASREC/SARFAESI/८५७/२०२४-२०२ दिनांक ०६.०९.२०२४ रोजी सरफेसीचे नियम ८(६) आणि ९(१) अंतर्गत सुरक्षित मालमत्तांच्या विक्रीसाठी वरील तारखेला कायदा आणि सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम.**

**सही/-**

**तारीखः ३०.११.२०२४**
**ठिकाणः मुंबई**

**इंद्रनाथ बिस्वास**
**अधिकृत अधिकारी आणि मुख्यमंत्री**
**ASREC (इंडिया) लि.**

# ४ लाख ५६ हजार मुलांना जंतनाशक गोळया वाटप होणार; जिल्ह्यात ४ डिसेंबरला राष्ट्रीय जंतनाशक मोहीम

**ठाणे-** ठाणे जिल्ह्यात ४ डिसेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेचे आरोग्य विभागाने सूक्ष्म नियोजन करून प्रत्येक पात्र लाभार्थ्याला जंतनाशकाची गोळी देऊन मोहीम प्रभावीपणे राबवावी, अशा सूचना जिल्हाधिकारी ठाणे अशोक शिनगारे व मुख्य कार्यकारी अधिकारी ठाणे रोहन घुगे यांनी दिल्या आहेत. मोहिमेत जिल्ह्यातील ग्रामीण भागात १ ते १९ वर्षे वयोगटातील चार लाख ५६ हजार ३५२ मुला-मुलींना जंतनाशक गोळया देण्यात येणार आहेत. जंतामुळे बालकांमध्ये व किशोरवयीन मुला - मुलींमध्ये अनेमिया, पोटदुखी, उलट्या, अतिसार, मळमळ, भूक मंदावणे इत्यादी आजारांचा धोका उद्भवतो. त्यामुळे हा धोका टाळण्यासाठी जंतनाशकाची गोळी घ्यावी, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी केले आहे. राष्ट्रीय जंतनाशक मोहीम जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली संपन्न होणार असून महिला व बालविकास विभाग, पाणी पुरवठा विभाग, ग्रामविकास विभाग तसेच शिक्षण विभागाच्या एकत्रित सहभागाने व समन्वयाने संपूर्ण जिल्ह्यातील ग्रामीण भागात हा कार्यक्रम शाळा व अंगणवाड्यामध्ये ४ डिसेंबर २०२४ व जंतनाशक मोहिमेच्या दिवशी जी मुले उपस्थित राहणार नाहीत त्यांना १० डिसेंबर २०२४ रोजी (मॉप अप दिवशी) गोळया देऊन साजरा करण्यात येणार आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये एकूण ५ तालुक्यामध्ये ग्रामीण भागातील ३६ प्राथमिक आरोग्य केंद्र, १ हजार ९११ अंगणवाडी, १ हजार ५४१ शासकीय शाळा, शासन अनुदानित २५५ शाळा, आश्रम शाळा ७१, खाजगी शाळा ३९८ आणि ३७ तांत्रिक संस्था व महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय जंतनाशक मोहीम राबविण्यात येणार आहे. १ ते १९ वयोगटातील अंबरनाथ तालुक्यात १ लाख ५९ हजार ०६० अपेक्षित लाभार्थी, भिवंडी तालुक्यात १ लाख ०५ हजार २९१ अपेक्षित लाभार्थी, कल्याण तालुक्यात ५० हजार १८३ अपेक्षित लाभार्थी, मुरबाड तालुक्यात ५० हजार २७५ अपेक्षित लाभार्थी, शहापूर तालुक्यात ९१ हजार ५४३ अपेक्षित लाभार्थी असून एकूण ठाणे ग्रामीण भागात ४ लाख ५६ हजार ३५२ अपेक्षित लाभार्थी आहेत. या मोहिमेच्या अनुषंगाने जिल्ह्यामध्ये जिल्हा, तालुका, प्राथमिक आरोग्य केंद्र अशा तीन स्तरावर प्रशिक्षण दिले असून सर्व तालुका वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी प्रा. आ. केंद्र, बाल विकास प्रकल्प अधिकारी, आरोग्य पर्यवेक्षक, अंगणवाडी पर्यवेक्षक, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, नोडल शिक्षक यांना प्रशिक्षण दिले आहे. या मोहिमेपासून एकही बालक वंचित राहणार नाही याबाबत आरोग्य विभागाकडून संबधित सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

# जे एम एफ संस्थेमध्ये Animia Mukta तपासणीचे भारत विकास परिषदे कडून तज्ञ डॉक्टरांचे शिबिर आयोजन व संविधान दिवस साजरा..

**डोंबिवली ( प्रतिनिधी ) -** सामाजिक कार्य आणि बांधिलकीच्या भावनेतून च जे एम एफ संस्था मध्ये विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात. मुलींच्या व महिलांच्या शरीरात हिमोग्लोबिन ची कमतरता होण्याचे प्रकार सध्या अस्तित्वात दिसून येत आहे. मुलींचे स्वास्थ नीट असावे असा विचार करून संस्थेच्या संस्थापिका सचिव डॉ प्रेरणा कोल्हे व संस्थापक डॉ राजकुमार कोल्हे यांनी भारत विकास परिषदेच्या अंतर्गत तज्ञ शल्य चिकित्सकांचे शिबिर मधुबन वातानुकुलीत दालनांमध्ये आयोजित केले. जे एम एफ संस्था अंतर्गत जन गण मन इंग्लिश शाळा आणि विद्यामंदिर तसेच वंदे मातरम महाविद्यालय मधील वय वर्षे दहा पासून पुढे सर्वच विद्यार्थीनी ,महिला पालक ,शिक्षिका यांच्यासाठी रक्तक्षय तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून कोकण प्रांताचे अध्यक्ष सीमांत जी प्रधान, अध्यक्ष ॲड.वृंदा कुलकर्णी, डॉ.सचिन पेणकर ,डोंबिवली शाखेचे संस्थापक अध्यक्ष श्री.माधव जोशी यांची उपस्थिती प्रार्थनीय होती तर कारगिल युध्दात शहीद झालेले कॅप्टन विनय कुमार सचान यांचे मातोश्री व पिताश्री आवर्जून उपस्थित होते. सर्व मान्यवरांचे शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.भारत माता व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. संस्थेचे संस्थापक माननीय डॉ राजकुमार कोल्हे यांनी आज संविधान दिवस म्हणून उपस्थित सर्व समुदाय व



विद्यार्थी यांच्याकडून भारताचे संविधान उद्देशिका प्रतिज्ञा घेतली.त्याच बरोबर २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याला आज १६ वर्ष पूर्ण झाली. त्या सर्व शहिदांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. आजच्या कार्यक्रमाबद्दल बोलताना डॉ राजकुमार कोल्हे म्हणाले की , सर्व विद्यार्थीनी आणि महिलांनी मनाबरोबरच शरीराने ही तंदुरुस्त असावे, त्यासाठी योग्य सात्विक आहार सेवन करावा.स्त्री ही शक्तीचे रूप आहे, एकाच वेळी अनेक कामे करताना आपल्या शरीरातील होणाऱ्या बदलांकडे ही लक्ष द्यावे व काळजी घ्यावी असे सांगितले. दहा वर्षा पुढील सर्व विद्यार्थिनींनी पोषक आहार सेवन करून व्यायाम करणे गरजेचे आहे तरच रक्तातील लाल पेशी वाढतील असे सचिव डॉ प्रेरणा कोल्हे यांनी विद्यार्थिनींना सांगितले तर रोजची तारेवरची कसरत करणाऱ्या माझ्या सख्याना मी एवढच सांगू इच्छिते की कामातून वेळ काढून स्वतःच्या शरीराकडे लक्ष द्या व गोळया औषधंपेक्षा प्रोटीनयुक्त आहार घेऊन आपल्या रक्तातील लाल पेशीचे प्रमाण वाढवा असा सल्ला दिला. तज्ञ डॉक्टरांच्या पथकाने सर्व विद्यार्थिनी महिलांची रक्तक्षय तपासणी करून गरजेनुसार औषधेही दिली त्याच बरोबर सेवन करण्यासाठी प्रोटीन व लोह युक्त आवश्यक असे भाजके फुटाणे व गुळाचे पाकीट देखील सर्वांना दिले. यामधे १२०० च्या वर विद्यार्थी, पालक , शिक्षक यांनी भाग घेतला.

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## वृक्ष प्राधिकरण
## - जाहिर सूचना -

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (जानेवारी २०१८ सुधारलेला) कलम ८ (३) (क) मधील तरतूदी नुसार पुर्व उपनगरातील परिमंडळ - ६ मधील 'एस' विभागातील ०१ प्रस्ताव अशा **एकूण ०१** प्रस्तावास कलम ८ (६) अन्वये मा. म. न. पा. आयुक्त, अध्यक्ष वृक्ष प्राधिकरण समिती बृहन्मुंबई महानगरपालिका यांची मंजुरी प्राप्त झाली आहे.

उपरोक्त प्रस्तांवामधील झाडे कापणे / पुनर्रोपित करणेबाबतचा तपशील हा म. न. पा. च्या - https://portal.mcgm.gov.in/ संकेतस्थळावर, बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी विभाग आणि खाते खातेनिहाय माहिती पुस्तिका उद्याने व वृक्ष प्राधिकरण कागदपत्रे या लिंक वर उपलब्ध आहे. ७७८ (एस)

**उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी**
**यांचे कार्यालय**
**वीरमाता जिजाबाई भोसले उदयान,**
**व प्राणिसंग्रहालय,**
**२ रा मजला, हम्बोल्ट पेंग्विन कक्ष,**
**संत सावता माळी मार्ग, भायखळा (पूर्व),**
**मुंबई - ४०००२७**
**दूरध्वनी क्र. २३७४२१६२**
**Email id - dysg.ta@mcgm.gov.in**

**सही/-**

**उद्यान - अधिक्षक**
**व वृक्ष अधिकारी**

**पीआरओ/१८७१/जाहि/२०२४-२५**

**खाण्यापूर्वी तसेच शौचा नंतर साबणाने हात स्वच्छ धुवावे.**

# डंपर च्या धडकेत वडीलांचा जगीच मृत्यू तर मुलगा गंभीर जखमी

**अंबरनाथ (प्रतिनिधी) :** अंबरनाथ येथील चिखलोली जवळ विटा ने भरलेल्या डंपरला ओव्हरटेक करताना एम आय डीसी च्या एयरवाल कट्ट्याला धडकल्याने वडील व मुलाचा अपघात झाला असुन हे डंपर खाली सापडल्याने वडीलांचा जागीच मृत्यु झाला आहे. तर मुलगा गंभीर जखमी झाला असल्याने त्याला खासगी रुग्णालयात उपचारा साठी दाखल करण्यात आला आहे. अंबरनाथ येथील अर्चीड स्कायर येथे राहणारे पारसनाथ पाल हे त्यांच्या मुलां सोबत मोटर सायकल ने उल्हासनगर च्या दिशेने जात असताना काल सकाळी साडे अकरा वाजता चिखलोली येथील जांभूळ नाक्या जवळ त्यांच्या पुढे विटा ने भरलेल्या डंपर चा पाल यांनी ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याची मोटर सायकल एम आय डीसी तील एयरवॉल च्या कट्ट्या ला धडकल्याने त्यांचा तोल गेला आणि ते डंपर खाली सापडले. त्यात पाल यांचा जगीच मृत्यू झाला तर मुलगा अभिषेक हा गंभीर जखमी झाला. या घटने ची माहिती मिळताच पोलिसांनी घटस्थळी धाव घेऊन डंपर चालकाला ताब्यात घेतलेआहे तसेच पारसनाथ पाल यांचा मृतदेह शासकीय रुग्णालयात नेण्यात आला आहे . या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत . तर एम आय डीसी तील एयर वॉल च्या कट्ट्या मुळे नेहमी दुर्घटना होत असल्याची तक्रार येथील नागरिकांनी केली आहे .

# १० डिसेंबर रोजी कोकण विभागीय पेन्शन अदालत

**नवी मुंबई (प्रतिनिधी) :-** कोंकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवार दि. १० डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११.०० वा. कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोंकण भवन येथे आयोजित केली आहे. सदर पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोंकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे. असे तहसिलदार,(सामान्य प्रशासन) कोंकण विभाग यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.